## नि.क्र.५० वरील आदेश
## (पारीत दि.०८.०१.२०२६)

वादींनी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ पुंडलिक आश्राबा कदम यांचे मृत्यू पश्चात त्यांचे वारस अभिलेखावर घेणेकामी दाखल केला आहे.

२. वादींचे असे कथन आहे की, त्यांचा दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.१ पुंडलिक हे दि.२६.०२.२०२० रोजी मयत झाले. परंतु त्यांना सदरची बाब माहित नव्हती. त्यांना प्रतिवादी क्र.१ च्या मृत्यूबाबत प्रतिवादी क्र.२ यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन माहित झाले. त्यांचे पुढे असे कथन आहे की, मृतक प्रतिवादी क्र.१ यांचे प्रतिवादी क्र.२ व ४ हे कायदेशीर वारस असुन, त्यांच्या इतर वारसांमध्ये प्रस्तावित प्रतिवादी क्र.१(अ) व १(ब) यांचा समावेश होतो. प्रतिवादी क्र.१ यांची पत्नी ब–याच वर्षापूर्वी मयत झाली असुन, त्यांना उपरोक्त नमुद प्रतिवादी यांचे व्यतिरीक्त इतर कोणीही वारस नाही. सबब त्यांना मृतक प्रतिवादी क्र.१ यांचे कायदेशीर वारस म्हणुन प्रस्तावित प्रतिवादी यांना प्रतिवादी क्र.१(अ) व १(ब) म्हणुन अभिलेखावर घेणे अनिवार्य आहे. उपरोक्त विधानांसह, त्यांनी अर्ज मंजुर करण्याची मागणी केली आहे.

३. प्रस्तावित प्रतिवादी व प्रतिवादी क्र.४ यांनी वादींच्या अर्जावर त्यांचे म्हणणे सादर केले आहे.

४. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. तसेच वादीतर्फे सादर करण्यात आलेल्या लेखी युक्तिवादाचे अवलोकन केले.

५. वादींनी या प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र.१ मयत झाल्यानंतर त्याचे कायदेशीर वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्याची मागणी नि.क्र.४८ वरील अर्जाआधारे केली होती, तर उपशमन रद्द करण्याची मागणी नि.क्र.५२ वरील अर्जाआधारे

केली होती. सदरचे दोन्ही अर्ज मंजुर झालेले असुन, केवळ कायदेशीर वारस अभिलेखावर घेण्याची बाब प्रलंबित आहे. वादींना कायेदशीर वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात आल्यामुळे तसेच उपशमन रद्द केल्यामुळे कायदेशीर वारस अभिलेखावर घेणे ही औपचारीक बाब शिल्लक राहिलेली आहे. प्राप्त परिस्थितीत, वादींचा अर्ज मंजुर करणे योग्य व न्यायसंगत ठरेल. सबब पुढील आदेशः

**आदेश**

१. अर्ज (नि.क्र.५०) मंजूर करण्यात येतो.
२. वादींनी पुढील तारखेपर्यंत मृतक प्रतिवादी क्र.१ चे कायदेशीर वारस अभिलेखावर घेण्यासंदर्भात योग्य ती दुरुस्त करुन, विशोधीत दावा व त्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

Digitally signed by AYYUB BABU SHAIKH
Date: 2026.01.09 13:44:55 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

**( ए. बी. शेख )**

दि.०८.०१.२०२६

दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
वैजापूर.

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करतो की, पीडीएफ करुन अपलोड केलेल्या आदेशामधील शब्द–नि–शब्द हे मुळ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाखे नावः– अनंत वि. चोपडे (लघुलेखक श्रेणी–२).
न्यायालयाचे नावः– दिवाणी न्यायालय, व.स्तर, वैजापूर
आदेश दिनांकः– ०८–०१–२०२६
आदेशावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांकः– ०९–०१–२०२६
आदेश अपलोड केल्याचा दिनांकः– ०९–०१–२०२६

..................................................................